गोदाआरती चौथऱ्याच्या बांधकामावरुन वाद

रामतीर्थ समिती, पुरोहित संघ व गोदाप्रेमी आमने-सामने

नाशिक । दि.६ प्रतिनिधी

रामतीर्थ सेवा समितीने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत ११ कोटी रुपयांच्या निविदा काढलेल्या कामाला गती देण्याची मागणी केली असताना, येत्या २-३ दिवसात आपण स्वत: कामाला प्रारंभ करण्यासाठी येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले होते. त्या पार्श्वभूमीवर गोदाघाटावरील दुतोंड्या मारूती जवळील पायऱ्या तोडून तेथे गोदावरी आरती करण्यासाठी चौथरे बांधण्याचे काम ला शनिवारी (दि.६) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रारंभ करण्यात आले होते. मात्र या कामामुळे सिंहस्थ कुंभमेळ्यात अडचण निर्माण होणार असल्याने कारण सांगून पुरोहित संघाने विरोध केला व काम बंद पाडले होते. काल पुन्हा एकदा हे काम सुरू करण्यात आले असता पुरोहित संघाने काम थांबवत त्याठिकाणी ठिय्या आंदोलन केले.

हरिद्वार व वाराणसीच्या धर्तीवर गोदावरी नदीची महाआरती व्हावी, ही अनेक वर्षांपासूनची नागरिकांची मागणी होती. यावर राज्य सरकारने सकारात्मक विचार करून गोदावरी महाआरती करता ११ कोटी ६६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. महाआरती करता लागणाऱ्या सुविधा तसेच गोदाघाटावरील सुशोभीकरण या विकासकामांसाठी हा निधी राज्य सरकारने दिला आहे. दरम्यान या ठिकाणी कशा स्वरूपात विकासकामे व्हावीत आणि या ठिकाणी होणाऱ्या विकासकामांवर देखरेख ठेवण्यासाठी रामतीर्थ गोदा समिती गठीत करण्यात आली. या रामतीर्थ गोदा समितीला गोदावरी महाआरतीचे व कामांची देखभाल करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र या समितीला पहिल्या दिवसापासून पुरोहित संघाने विरोध केला आहे. लोकसभा निवडणूक आचारसंहिता संपताच सार्वजनिक बांधकाम विभागाने याठिकाणी पायऱ्या तोडून आरती कठड्याच्या कामाला सुरूवात केली होती. त्याला विरोध झाल्यानंतर लागलीच शिक्षक मतदारसंघाची निवडणूक आचारसंहिता लागू झाल्याने काम थांबले होते. मात्र ती आचारसंहिता शिथिल होताच पुन्हा एकदा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठेकेदाराने शनिवार (दि.६) रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास याठिकाणी जेसीबी आणत कामाला सुरू करण्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी पुरोहित संघाचे सतीश शुक्ल, कल्पना पांडे, राजेंद्र बागूल, प्रतीक शुक्ल, चंद्रशेखर पंचाक्षरी, बापू जाधव, सुनील म हांकाळ, अविनाश दीक्षित आदींसह पुरोहित आणि स्थानिक नागरिकांनी या विकासकाम ला विरोध केला. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, याकरिता घटनास्थळी पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, सहा.पोलीस निरीक्षक विलास पडोळकर, अभिजीत पैठणकर, राजेश सोळसे यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आमचा गोदाआरतीला विरोध नसून, त्या नावाखाली पूररेषेत होणाऱ्या अतिक्रमित बांधकामाला विरोध आहे. रामकुंडातील सिमेंट काँक्रिट काढण्यासाठीच्या सर्व कायदेशीर आणि तांत्रिक बाबींची पूर्तता होऊनसुद्धा रामकुंडातील तळ सिमेंट काँक्रिट न काढता वर नव्याने पायऱ्यांवर कॉक्रिटीकरण करण्यास आमची सक्त हरकत आहे.

■ देवांग जानी, गोदाप्रेमी

गोदाप्रेमींचा पत्रव्यवहार अन् थांबले काम

गोदाघाटावर होणाऱ्या आरतीला आमचा कोणताही विरोध नाही. गोदाघाटावरील दुतोंड्या मारूती येथे करण्यात येणाऱ्या बांधकामाविरोधात गोदावरी गटारीकरण विरोधी मंचचे याचिकाकर्ते निशिकांत पगारे, गोदाप्रेमी देवांग जानी व राजेश पंडित यांनी यापूर्वीच संबंधित विभागांना उच्च न्यायालयाच्या मनाई आदेशानुसार विना परवानगी काम न करण्याबाबत नोटिसा दिल्या होत्या. मात्र यावर कोणत्याही प्रकारचे उत्तर न देता तसेच परवानगी न घेता परस्पर काम सुरू केल्याने आज परत एकदा विभागीय महसूल आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकाऱ्यांना स्मरणपत्र पाठवून कामास तत्काळ स्थगिती मिळवली असल्याचे समजते.

गोदाआरती, विकास कामांसाठी प्रत्येक कामाला पुरोहित संघाकडून आक्रमक विरोध होत असून, मात्र दुसरीकडे स्मार्ट सिटी कंपनीकडून त्याच गोदावरीपात्रात केलेल्या अनेक चुकीच्या कामांबाबत मवाळ भूमिका घेतली जात असल्याने पुरोहीत संघाच्या दुटप्पी भूमिकेवर नागरिक शंका उपस्थित करीत आहेत.

अखेर धान्य पुरवठा अधिकारी कार्यालय नाशिकला

आ. फरांदे यांच्या प्रयत्नांना यश

नाशिक । दि. ६ प्रतिनिधी

पूर्वीपासून नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयात असलेले धान्य पुरवठा अधिकारी कार्यालय नाशिकरोड येथे गेल्यानंतर सामान्य नागरिकांना मोठी त्रास सहन करावा लागत होता. किरकोळ कामासाठीही नाशिकरोडला जावे लागत होते. म्हणून हे कार्यालय पुन्हा नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयात आणण्याची मागणी होती. मध्य नाशिकच्या भाजप आ. देवयानी फरांदे यांनी याबाबत प्रयत्न करुन कार्यालय पुन्हा नाशिकला आणले.

शहरातील नागरिकांना रेशनकार्ड वितरित करणारे कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय येथून नाशिकरोड येथील गोदामात स्थलांतरित करण्यात आले होते. यामुळे जुने नाशिक, कॉलेजरोड गंगापूर रोड, इंदिरानगर, नवीन नाशिक, पंचवटी आदी भागातील नागरिकांना रेशनकार्डबाबतच्या समस्यांसाठी नाशिकरोड येथे जावे लागत होते. त्यामुळे हे कार्यालय नाशिक येथे स्थलांतरित व्हावे, यासाठी आ. फरांदे यांनी प्रयत्न केले होते. धान्य वितरण अधिकारी कार्यालय शहरापासून लांब गेल्यामुळे मोठ्या प्रमाणावर दलालांचा सुळसुळाट देखील झाला होता. त्यामुळे याबाबत देखील नागरिकांच्या मोठ्या

तक्रारी होत्या. आ. फरांदे यांनी पाठपुरावा करून कार्यालय पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालय येथे स्थलांतरित करण्यास मान्यता मिळवली. नवीन कार्यालयासाठी आवश्यक फर्निचर देखील आ. फरांदे यांनी उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे हे कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय आवारात आता सुरू असणार आहे. धान्य वितरण अधिकारी, व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी रेशन विभागातील नागरिकांचे प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी आ. फरांदे यांनी केली आहे.

गंगापूररोडवरील हुक्का उद्ध्वस्त

नाशिक। प्रतिनिधी

एबीबी सर्कलकडून येणाऱ्या भोसला महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून जवळ असलेल्या कॅफेत हुक्का विक्री व सेवन होत असल्याचा प्रकार उघड झाला आहे. गंगापूर पोलिसांनी येथे छापा टाकून ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यासह हुक्का पुरविणाऱ्यासह सेवन करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करुन कारवाई केली आहे.

महात्मानगर सिटी लिंक बसस्थानकाजवळ असलेल्या एका कॅफेत गंगापूर पोलिसांनी धाड टाकली. तेव्हा संशयित हार्दिक अतुल आहिरे (वय २५, रा. द्वारका) आणि कल्पेश सुभाष गांगुर्डे (३८, रा. म्हसरुळ) हे दोघे आतमध्ये आढळून आले. गंगापूर पोलिस ठाण्याच्या पथकाने कॅफेत तपासणी केल्यावर त्यांना विनापरवानगी हुक्का पार्लर सुरु असल्याचे दिसले. वरिष्ठ निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या सूचनेने पथकाने साडेचार हजार रुपयांचे तीन हुक्का पॉट, ड्रब्रेन फ्रिज अपफ, ड्रलश आइसफ, केवा थ्री पानफ या फ्लेवर्सचे प्रत्येकी दोन तंबाखुयुक्त पाकिटे, साडेचार हजारांच्या खुर्च्या, साडेतीन हजारांचे स्टूल, पंधरा हजाराचा सोफा असा मुद्देमाल जप्त केला. दरम्यान, दोन संशयितांविरुद्ध गुन्हा नोंदवून त्यांना ताब्यात घेण्यात आले. मात्र, महाविद्यालयापासून अगदी जवळच कॅफेत हुक्का विक्री होत असल्याने कॅफेंतील गैरप्रकारांचा मुद्दा उघड होत आहे.

धिंगाण्यानंतर कारवाई

उपनगर पोलिसांच्या हद्दीत मध्यरात्री साडेबारापर्यंत हॉटेल सुरु असल्याचे समोर आले. याप्रकरणी उपनगर पोलिसांनी संशयित गणेश भैरू भोर (वय ३२, रा. चिंचवडे पिंपळगाव खांब) या हॉटेल मालकासह नंदू शिवाजी बोराडे (२६), आकाश दादासाहेब पवार (२४, उत्तमनगर), प्रशांत छबुलाल चव्हाण (२१, शुभम पार्क) व सागर सुखदेव पाथरकर (२५, उत्तमनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला. हॉटेलचे बिल देण्याच्या कारणातून तिथे आरडाओरड करुन मारामारी सुरु असताना पोलिसांनी कारवाई केली.

अतिक्रमण हटले पण...

कॉलेजरोड परिसरातील आस्थापनांचे अतिक्रमण हटवून महापालिकेने कामगिरी केली. परंतु, पुन्हा वाहतूक कोंडीसह आस्थापनांबाहेरील समस्या उद्भवत आहेत. मॉडेल कॉलनी चौक, शहीद सर्कल, प्रसाद सर्कल या ठिकाणी सतत वाहतूक कोंडी होते. वाइन शॉप, कॅफे, हॉटेल्सबाहेर बेशिस्तरित्या वाहने उभी केली जातात. आस्थापनांचे मालक किंवा चालक ग्राहकांना शिस्त लावण्याचे सोपस्कारही पार पाडत नाहीत. किंबहुना विकेंडला होणाऱ्या ड्रलेट नाइट पार्ट्यांफ्मुळे इथे चारचाकीहींची रीघ असते. गुन्हे नोंदविण्याची मागणी नागरिकांची आहे.

रियलमीचा नवा स्मार्टफोन

नाशिक । दि. ६ प्रतिनिधी

लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड, रियलमीने नुकतीच रियलमी सी ६३ लाँच करण्याची घोषणा केली. रियलमी सी ६३ त्यांच्या चॅम्पियन मालिकेतील नवीनतम जोड आहे. रियलमी सी ६३ हा बजेट स्मार्टफोन आहे. व्हेगन लेदर डिझाइनसह हा फोन उपलब्ध आहे. स्टाईल आणि टिकाऊपणासह जलद चार्जिंग व पॉवर-अप, कमी डाउनटाइम, ५००० एमएएच बॅटरी यांसारख्या वैशिष्ट्यांसह उपलब्ध होणार आहे.

गुरुदत्त जन्मशताब्दी कार्यक्रम

नाशिक । दिवंगत गुरुदत्त यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या चित्रपट गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात गायक संजय अडावदकर, प्रमोद कापडणे व चंदन सोदे गीत सादर करतील. इंदिरा नगर येथील स्वर्णिमा हॉल येथे मंगळवार दिनांक ९ जुलै रोजी संध्याकाळी ६ वाजता कार्यक्रम सुरु होईल. कार्यक्रम निशुल्क असून, रसिकांनी याचा आस्वाद घ्यावा. असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

डॉ. नलिनी बागुल यांना पुरस्कार

नाशिक । आयव्हीएफ क्षेत्रातील यशस्वी योगदान बद्दल डॉ. नलिनी बागुल यांना गेल्या महिन्यात शिर्डीत द्रोणाचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांनी हजारो अपत्यहीन परिवारांना आयव्हीएफ या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे संतती प्राप्तीचा आनंद मिळवून दिला आहे. याचप्रमाणे कोलकत्ता येथे एका समारंभात डॉ. बागुल यांना प्रतिभावान व कुशल स्त्रीरोग तज्ज्ञ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जितेंद्र मोटर्स, कमल कारलाईनचा रौप्य महोत्सव

नाशिक । येथील महिंद्राचे अधिकृत विक्रेते मे. जितेंद्र मोटर्स व कमल कारलाईन यांचा रौप्यमहोत्स कार्यक्रम नुकताच बिवायकेच्या गुरुदक्षिणा हॉलमध्ये पार पडला. यावेळी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच महिंद्राचे खानोलकर, झोनल मॅनेजर दिपक सिन्हा, कौशिक मुखोपाध्याय, रि प्लांट हेड हिरामण आहेर, अतुल टंडन, राजनजी छिब्बर, विशाल शर्मा, रोहित कोलते, स्वप्नील नलावडे उपस्थित होते

विठोबा टूथपेस्टची नवी ब्रँड अँबेसेडर श्रुती

नाशिक । दि. ६ प्रतिनिधी

डेन्टल केअरसाठी प्रसिद्ध असलेला ब्रँड विठोबाच्या टूथपेस्ट श्रेणीसाठी आता सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रुती हसन करारबद्ध झालेली आहे. विठोबा आयुर्वेदिक दंतमंजन या आयुर्वेदिक प्रोडक्टपासून सुरुवात झालेली ही कंपनी आता त्यांच्या टूथपेस्टसाठीही ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहे. विठोबाचे आता ओरल केयर व्यतिरिक्त इतरही आयुर्वेदिक प्रॉडक्ट बाजारात उपलब्ध आहेत यात स्टेअँक्टिव पेन रिलीफ ऑइल, हेयर ऑइल,केशरत्न हेअर कलर ,केशरत्न हिना मेहंदी, वैजयंती केशरयुक्त साबण अशी उत्पादने आहेत.

सायकलिस्ट वारकऱ्यांना भेटवस्तू

नाशिक । येथील सायकलिस्टस फाउंडेशनतर्फे तीन दिवसीय पर्यावरणपूरक सायकल पंढरपूर वारीचे आयोजन करण्यात आले आहे. सायकल वारीतील सर्व वारकऱ्यांना अडावदकर ज्वेलर्सकडून गुडी बॅग व भेट वस्तू देण्यात आल्या.

डॉक्टरांचा सन्मान

नाशिक । दि. ६ प्रतिनिधी

मॉर्निंग ग्रुप परिवार व श्रीराम हास्य क्लबच्या वतीने सुशील आय केअर युनिट ऑफ डॉक्टर अग्रवाल हॉस्पिटलमध्ये डॉक्टर्स डे साजरा करण्यात आला. यानिमित्ताने कॉलेज रोड व आयटीआय सिग्नल जवळील हॉस्पिटल येथे ज्येष्ठ नागरिकांनी हॉस्पिटलच्या सर्व डॉक्टरांचा यथोचित सत्कार केला. डॉ. सनय महाजन, डॉ. शुभांगी पिंपरीकर, डॉ. शिल्पा बोथरा, डॉ. निधी पाटील, केंद्रप्रमुख डॉक्टर पल्लवी नागवंशी , मोनाली बरके, यांचा सत्कार करण्यात आला. जेष्ठ नागरिकांची डोळ्यांची तपासणी मोफत करण्यात आली. कार्यक्रमास रिझवान इनामदार, जितेंद्र येवले यांचे सहकार्य लाभले

आज अनोख्या वारीचे आयोजन

नाशिक । दि.६ प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या निमित्ताने नाशिक प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ संघटना अर्थात एनओजीएसकडून अनोख्या वारीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरची वारी रविवारी (दि.७)सकाळी ८ .३० वाजता गोविंद नगर, ट्रीट हॉटेल, मनोहर गार्डन नाशिक येथून निघणार आहे. या वारीम ध्ये शहरातील सर्व स्त्रीरोग तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.ड्ढवारी स्त्री आरोग्याचीफ असे वारीचे नामकरण करण्यात आले आहेत. ही वारी मनोहर गार्डनपासून निघून पुढे ठक्कर डोमपर्यंत जाऊन परत, ट्रीट हॉटेलला परत आणण्यात येणार आहे.

या मार्गावर पाच ठिकाणी थांबे घेणार आहे. वारकरी ज्याप्रमाणे विठोबा भेटीला जातात, अगदी त्याचप्रमाणे ही वारी काढली जाणार आहे. या वारीबाबत अधिक माहिती देतांना एनओजीएसच्या अध्यक्ष डॉ. संगिता वाघ यांनी सांगितले की, या वारीच्या माध्यम ातून स्त्री आरोग्याबाबत जनजागृती करण्याचा आमचा प्रयत्न आहे. अनेकदा महिला घरातील सगळ्यांची काळजी घेत असतांना स्व:ताच्या आरोग्याकडे मात्र पूर्णपणे लक्ष देत नाहीत. आरोग्याच्या तक्रारींकडे जागरूकपणे पाहात नाही. अनेकदा हाच हलगर्जीपणा पुढे गंभीर आजारांचे रूप धारण करतो. याकडे आम्ही लक्ष वेधण्याचा प्रयत्न या वारीतून केला जाणार आहे. या वारीसाठी डॉ. निशा पाटील यां मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. सोबतच सचिव डॉ.अंजली कुलकर्णी, डॉ. आरती कुलकर्णी, डॉ. विजय लोहारकर, डॉ. कांचन देसले, डॉ. कमलेश लहामगे, डॉ. सुप्रिया देवरे, डॉ. आरती पारीख, डॉ. कल्पना संकलेचा, डॉ. नीलिमा कुलकर्णी, डॉ. श्रद्धा वाळवेकर, डॉ. आरती गोवर्धने, डॉ. सौरभ संकलेचा याचे मोलाचे योगदान राहणार आहे.

पावसामुळे महिलेचा मृत्यू

नाशिक । दि. ६ प्रतिनिधी

सुरगाणा तालुक्यात सुरु असलेल्या संततधार पावसामुळे मौजे सोनगीर येथील नाल्याला पूर आला. त्यात कमळाबाई तुळशीराम भोये (वय ६०) या नाल्यात वाहून गेल्या. त्यातच त्यांचे निधन झाले. तसेच मौजे दोडीपाडा येथे शिवाजी चौधरी यांच्या घराचे नुकसान झाले आहे.

जिल्ह्यातील काही भागांत संततधार असली तरी शहरात रिमझिम पाऊस सुरू असुन दिवसभरात ५.२ मि. मी. पावसाची नोंद झाली.

इंटरनेटची 'फायबर केबल' कापली

समाजकंटकांचा हैदोस; मुंबई नाका पोलिसांत कंपनीकडून तक्रार

नाशिक । शहर पोलिसांना आता समाजकंटकांसह टवाळखोरांनी आव्हान दिले आहे. वाहने तोडफोड, चोऱ्या, हाणामारीसह आता थेट इंटरनेट केबल कापण्याचा प्रकार घडला आहे. जिओ फायबरने यासंदर्भात मुंबई नाका पोलिसांत तक्रार दिली आहे. तर इंटरनेट सुविधा पूर्ववत करीत असून पुढील दोन-तीन दिवसांत काम पूर्ण होणार असल्याने जिओ डिजिटल फायबरने सांगितले आहे.

शहरातील विविध परिसरात काही दिवसांपासून जिओ डिजिटल फायबरच्या इंटनेट सुविधेत अडचणी येत असल्याने युजर्सने तक्रारी केल्या आहेत. यासंदर्भात जिओ फायबरने इंटरनेटच्या केबल्स दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. बऱ्यापैकी काम पूर्ण झाले असून बऱ्याच परिसरातील समस्यांचे निवारण झाले आहे. मात्र, अजूनही काही ठिकाणी इंटरनेट सुविधेत अडथळे असून ते पुढील दोन-तीन दिवसांत दूर होण्याची शक्यता आहे. दरम्यान, जिओ डिजिटल फायबरतर्फे मुंबई नाका पोलिसांत लेखी तक्रार अर्ज देण्यात आला आहे. गणेश विहार परिसरातील प्रल्हाद आर्केडजवळील इंटरनेट केबल अज्ञातांनी कापली आहे. असेच प्रकार शहरातल्या अनेक भागात घडल्याचा दावा तक्रार अर्जात करण्यात आला आहे. त्यानुसार पोलिसांनीही सीसीटीव्ही तपासून केबल कापणाऱ्यांचा शोध सुरु केला आहे. मात्र, विनाकारण केबल्स कापून मालमत्तांचे नुकसान करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईची मागणी नागरिकांनी केली आहे. तर, केबल कापणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेण्यासह हे नुकसान करण्यासाठी त्यांचा उद्देश काय आहे, याचाही तपास सुरु झाला आहे.

पोलीस होण्याचे स्वप्न अपुरे

मैदानी चाचणीदरम्यान तरूणाचा मृत्यू

पुणे । दि.६ वृत्तसंस्था

अंगात पोलिसांची वर्दी घालून देशसेवा करण्याच्या स्वप्नाला गवसणी घालण्यासाठी अहोरात्र मेहनत ही घेतली होती. बघता बघता परीक्षेची तारीख जाहीर होताच आपले नशीब आजमावण्यासाठी त्याने पुणे गाठलें. मात्र पोलीस बनायचें त्याचे हे स्वप्न अंतिम चाचणीत स्वप्नच राहिले आणि त्याने पोलीस मैदानातच शेवटचा श्वास घेतला.

ही दुदैवी घटना घडली आहे संगमनेर तालुक्यातील कोठे गावचा रहिवासी असलेल्या तुषार भालके या २७ वर्षीय युवकासोबत. पुणे येथे सुरू असलेल्या पोलीस भरती दरम्यान तुषार भालके हा तरूण धाव चाचणीत धावत असताना त्याला अचानक चक्कर आली आणि तो जमिनीवर पडला. दरम्यान त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत असून हा घटनेमुळे भालके कुटुंबियांवर दु: खाचा डोंगर कोसळला आहे. पुण्यात शिवाजीनगर पोलीस ग्राऊंडवर पोलीस भरती प्रक्रिया सुरू आहे. आज सकाळी ८ वाजेच्या सुमारास तुषार भालके या युवकाने रनिंगचे तीन राऊंड पूर्ण केले. पण धावत असताना त्याच्या पायात अचानक क्रॅम्प आला, मस्सल ब्रेक झाले आणि तो जागीच कोसळला. त्यानंतर घटनास्थळी उपस्थित पोलीस भर्ती अधिकाऱ्यांनी तात्काळ त्याला अँम्ब्युलन्समधून पुण्यातील ससून रुग्णालयात नेलें. पण डिहायड्रेशन होऊन प्रथम त्याच्या किडनी फेल झाल्या आणि मग हृदय बंद पडले. आणि त्यातच मल्टिपल ऑर्गन फेलुअर होऊन त्याचा उपचारादरम्यान दुर्दैवी अंत झाला. पोलीस भरती दरम्यान युवकाचा दुर्दैवी अंत होण्याची राज्यातली ही तिसरी घटना आहे. यापूर्वी एसआरपीएफच्या भरतीत मुंबईत दोन युवक दगावलेत. त्यानंतर आज पुण्यात हा तिसरा प्रकार घडला.